# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 15.02.2025** **वार- शनिवार**

---

**जीबीएस**

पुणे विभागात गुइलेन बॅरे सिंड्रोम म्हणजे जीबीएसचे आतापर्यंत २०५ रुग्ण आढळून आले आहेत. या रुग्णांमध्ये प्रामुख्यानं कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी आणि नोरोव्हायरसचा संसर्ग आढळून आला असून, हेच जीबीएस उद्रेकाचं कारण असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य विभागानं दिली आहे. या रुग्णांपैकी १०६ म्हणजेच ५१ टक्के रुग्ण सिंहगड रस्त्याच्या ५ किलोमीटर परिसरातील आहेत. उर्वरित ९९ रुग्ण पुणे शहरातील इतर भाग, ग्रामीण आणि जिल्ह्याच्या भागात आढळून आले आहेत. सिंहगड रस्ता परिसरात आढळलेले ९० रुग्ण हे नांदेड गावातील विहीर आणि खडकवासला धरणातील पाण्याचा स्त्रोत वापरणारे आहेत. या परिसरातील दोघांचा जीबीएसमुळे मृत्यू झाला आहे. सिंहगड रस्ता परिसरातील जीबीएस रुग्णांच्या तपासणीमध्ये २५ रुग्णांमध्ये कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी हा जीवाणू संसर्ग निष्पन्न झाला आहे. तर ११ रुग्णांना नोरोव्हायरस हा विषाणू संसर्ग झाल्याचं निदर्शनास आलं आहे.

**शेतकरी**

पुणे जिल्ह्यात आत्तापर्यंत 2 लाख 8 हजार 886 शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्यात आले आहेत. त्यात सर्वाधिक ओळख क्रमांक जुन्नर तालुक्यात दिले आहेत. पुणे शहरात शेतकऱ्यांची संख्या कमी असल्यानं केवळ 21 शेतकऱ्यांना ओळख क्रमांक दिले आहेत. शेतकऱ्यांकडे जमीन, कर्ज, मिळणाऱ्या योजनांचा लाभ आदी माहिती असणारं एक ओळखपत्र ॲग्रिस्टेकच्या माध्यमातून दिलं जात

आहे. कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी ओळख क्रमांक यापुढे गरजेचा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नोंदणी करून ओळख क्रमांक तयार करून घेण्याचं आवाहन उपजिल्हाधिकारी नामदेव टिळेकर यांनी केलं आहे.

**<u>राडारोडा</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरात सार्वजनिक ठिकाणी कचरा, राडा-रोडा, प्लास्टिक, आरएमसी प्लांटमधून होणारं हवेचं प्रदूषण, बांधकामाच्या ठिकाणी होणारा कर्कश आवाज, शहरात होणारं ध्वनी प्रदूषण, घरांचं बांधकाम करतांना घराच्या बाहेर टाकला जाणारा राडारोडा तसंच सार्वजनिक मालमत्तेचं विद्रुपीकरण करणाऱ्यांवर चोवीस तास करडी नजर ठेवणार आहे. त्यासाठी महानगरपालिकेनं काही संस्थांची स्वतंत्रपणे नेमणूक केली आहे. नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

**<u>संतसेवालाल</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात क्रांतिकारी संत सेवालाल महाराज यांची जयंती आज साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉक्टर सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉक्टर पराग काळकर यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. याप्रसंगी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राध्यापक डॉक्टर धोंडीराम पवार यांनी यावेळी संत सेवालाल महाराज यांचा समता, सुधारणा, आणि वैज्ञानिक दृष्टीकोन त्यांच्या चरित्रातून उपस्थितांसमोर मांडला. याप्रसंगी शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**<u>पवनाथडी</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं २१ ते २४ फेब्रुवारी दरम्यान सांगवी इथल्या पीडब्ल्युडी मैदानावर पवनाथडी जत्रेचं आयोजन करण्यात आलं आहे. मैदानावरील जागेचा विचार

करून दालनधारकांचं योग्य पद्धतीनं नियोजन करण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिल्या.

**<u>जयंती</u>**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची प्रेरणा देशातील सैनिकांना मिळावी या उद्देशानं मराठा टायगर फोर्सच्या वतीनं दरवर्षी वेगवेगळ्या राज्यात शिवजयंतीचं आयोजन करण्यात येतं. याच धर्तीवर यावर्षी येत्या 22 फेब्रुवारीला राजस्थानमधील जैसलमेर जिल्ह्यात भारत पाकिस्तान सीमेवर असणाऱ्या श्री तनोट राय माता मंदिराच्या परिसरात सीमा सुरक्षा बलाच्या जवानांसोबत शिवजयंती निमित्त ऐतिहासिक सोहोळ्याचं आयोजन करण्यात आल्याची माहिती मराठा टायगर फोर्सचे संस्थापक अध्यक्ष संदीप लहाने पाटील यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली.

**<u>पियानो</u>**

गायक आणि संगीतकार रामचंद्र चितळकर उपाख्य सी. रामचंद्र यांच्या वापरातील पियानो मुंबईचे सुरेश यादव यांच्यातर्फे पुण्यातील राजा दिनकर केळकर संग्रहालयाला उद्या सुपूर्द करण्यात येत आहे. सी रामचंद्र यांच्यासोबत अकॉर्डियन वादन करणारे इनॉक डॅनियल यांच्या हस्ते हा पियानो स्विकारण्यात येणार असल्याचं राजा केळकर संग्रहालयाचे संचालक सुधन्वा रानडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**<u>स्नूकर</u>**

पुणे जिल्हा बिलीयडर्स आणि स्नुकर संघटना स्नुकर मानांकन स्पर्धा सुरू आहेत.  स्पर्धेत आशिष हुले, अभिजीत परमार, गोविंद सिंग, सौरभ जाधव, प्रतिक उफाडे, किशोर मोरे आणि सुरज रावत यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून मुख्य ड्रॉ फेरीमध्ये प्रवेश केला.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**